नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०६/०३/२०२६ (शुक्रवार )**

## पेपरफुटी प्रकरणात पोलीस स्टेशन उमरेड येथे गुन्हा नोंद, गुन्हयाचे तपासाकरीता विशेष तपास पथक (Special Investigation Team – SIT) गठित १ आरोपी अटक

**पोलीस स्टेशन उमरेडः—** फेब्रुवारी २०२६ मध्ये झालेल्या इयत्ता १२ वी च्या पेपरफुटी प्रकरणाचे धागेदोरे उमरेड सोबत असल्याच्या माहीतीवरून महाराष्ट्र राज्य, उच्च माध्यमिक ,विभागिय मंडळ यांनी सदर प्रकरणाची चौकशी केली . त्या चौकशीमध्ये टार्गेट ॲकॅडमी सायन्स ऑफ उमरेड चे संचालक अतुल चौधरी आणि महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक विभागिय मंडळ यांनी विश्वासाने नियुक्त केलेल्या अज्ञात व्यक्तीने कटकारस्थान करून पेपर फोडल्याचे निष्पन्न झाले. टार्गेट ॲकॅडमी सायन्स ऑफ उमरेड यांनी इयत्ता १२ वीच्या परिक्षा सुरू होण्यापुर्वी काही दिवसांअधी रसायनशास्त्राचा सराव पेपर घेतला होता. त्या सराव पेपर मधील आणि मंडळामार्फत घेण्यात आलेल्या रसायशास्त्राच्या पेपर मधील बऱ्याच प्रश्नामध्ये साम्य असल्याचे प्राथमिक चौकशीत आढळुन आल्याने सदर प्रकरणी शिक्षणाधिकारी, (माध्यमिक), जिल्हापरीषद, नागपुर यांच्या अहवालावरून दिनांक ०५/०३/२०२६ रोजी पोलीस स्टेशन उमरेड येथे अप क्रमांक ३५०/२६ कलम ६ महाराष्ट विदयापिठाच्या , मंडळाच्या व इतर विनिर्दिष्ट परीक्षा मध्ये होणाऱ्या गैरप्रकारास

प्रतिबंध अधिनियम १९८२, सह कलम ६१(२), ३१६(५) भा न्या सं अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचे गांर्भिय लक्षात घेता मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशाने सदर गुन्हयाचे तपास कामी विशेष तपास पथक गठित करण्यात आले आहे. सदर विशेष तपास पथकाचे प्रमुख श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा हे असुन १) श्रीमती वृष्टी जैन, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग , २) श्री अंकुश माने, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे, शाखा, नागपुर ग्रामीण, ३) श्री आशिषसिंग ठाकुर, सहा. पोलीस निरीक्षक, (प्रभारी अधिकारी) पोलीस स्टेशन केळवद आणि ४) श्री सतिष राठोड, पोलीस हवालदार, पोलीस स्टेशन सायबर , नागपुर ग्रामीण हे या विशेष तपास पथकाचे सदस्य आहेत. असे ५ सदस्यीय विशेष तपास पथक गठित करण्यात आले आहे. सदर विशेष तपास पथकाकडून प्रश्नपत्रिका फुटीमागील संपूर्ण साखळीचा बारकाईने तपास करण्यात येणार आहे.

सदर गुन्हयात टार्गेट ॲकॅडमी सायन्स ऑफ उमरेड चे संचालक अतुल जगन चौधरी, वय ३८ वर्षे, रा. प्लॉट क्रं ११०, भांदारकर ले आउट, उमरेड याला दिनांक ०५/०३/२०२६ रोजी ताब्यात घेवुन रात्री अटक करण्यात आली.

# खापा पोलीस स्टेशन हद्‌दीतील अवैध दारू व्यवसायातील ३ सराईत गुन्हेगारांना नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

पोलीस स्टेशन खापा हदद्‌ीतील अवैध दारू व्यवसायातील सक्रिय आरोपी **क्रं १) जयभिम शेषराव बागडे, वय ४३ वर्षे, रा बिचवा, ता सावनेर, जि. नागपुर, २) मायगो मधुकर वरखेडे, वय ३६ वर्षे, रा. कोथुळना, ता सावनेर, जि. नागपुर आणि ३) शैलेश भिमराव भालेराव, वय २७ वर्ष, रा. सिरोंजी, ता. सावनेर** यांना महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये उपविभागिय दंडाधिकारी, सावनेर यांनी हद्दपार केले.

सराईत गुन्हेगार नामे आरोपी **क्रं १) जयभिम शेषराव बागडे, वय ४३ वर्षे, रा बिचवा, ता सावनेर, जि. नागपुर , २) मायगो मधुकर वरखेडे, वय ३६ वर्षे, रा. कोथुळना, ता. सावनेर, जि. नागपुर आणि ३) शैलेश भिमराव भालेराव, वय २७ वर्ष, रा. सिरोंजी, ता. सावनेर** या तिन्ही आरोपीवर अवैध दारू बाबत **अनेक गुन्हे नोंद** आहे. नमुद आरोपींचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपींच्या गुन्हेगारी कृत्यामुळे परीसरातील अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद दोन्ही आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव खापा पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, सावनेर यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद आरोपी **क्रं १) जयभिम शेषराव बागडे, वय ४३ वर्षे, रा बिचवा, ता सावनेर, जि. नागपुर आणि**

क्रं २) मायगो मधुकर वरखेडे, वय ३६ वर्षे, रा. कोथुळना, ता सावनेर, जि. नागपुर यांना ३ महीन्यांकरीता तसेच क्रं ३) शैलेश भिमराव भालेराव, वय २७ वर्ष, रा. सिरोंजी, ता. सावनेर आरोपी याला २ महीन्यांकरीता नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हे नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.



हद्दपार आरोपी जयभिम शेषराव बागडे



हद्दपार आरोपी मायगो मधुकर वरखेडे



हद्दपार आरोपी शैलेश भिमराव भालेराव

# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ४५ लाख ५० हजारांचा मुद्देमाल जप्त मौदा पोलीस यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक ०५/०३/२०२६ रोजी मौदा पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेती ची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी माथनी टोल नाका येथे नाकाबंदी केली असता टाटा कंपनीचा १२ चक्का वाहन. क्र. एम. एच. ४० सि. टी. ४५९७ मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. **वाहन चालक चंद्रकांत पुरूषोत्तम दिघोरे, वय २५ वर्षे, रा. भिलेवाडा जि. भंडारा** हा मिळुन आला. त्याला वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष टाटा कंपनीचा १२ चक्का वा. क्र. एम.एच ४० सि.टी ४५९७ आणि त्याला जोडलेली विनाक्रमांकाची ट्रॉली आणि १० ब्रास रेती असा एकुण किमती ४५,५०,००० /—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद आरोपी विरूध्द पोस्टे मौदा येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**




मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने